# मानव संसाधन विकासाच्या दृष्टीकोनातून स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमावरीलप्रभाव - एक विश्लेषण

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र शाखेतील आचार्य (पीएचडी) पदवीकरीता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा


— मार्गदर्शिका —
डॉ. वसुधा विनोद देव
एम. कॉम., एम.ए. (अर्थशास्त्र)
एम.ए.(विषय संप्रेषण)
एम.एड्., सेट (शिक्षणशास्त्र)

—संशोधिका—
सौ. स्मिता गजानन जोगळेकर



पदव्युत्तर षिक्षण विभाग
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
जून-२०११

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | | प्रकरण विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ०१ | १ | प्रस्तावना | |
| | | १.१ विषयाची पार्श्वभूमी | |
| | | १.२ संशोधन विषयाचे शीर्षक | |
| | | १.३ संकल्पनात्मक विश्लेषण | |
| | | १.४ संषोधन विषयाची गरज | |
| | | १.५ संषोधन विषयाचे महत्व | |
| | | १.६ संषोधनाची उद्‌दीष्टये | |
| | | १.७ संषोधन चले | |
| | | १.८ संषोधनाची ग्रहितके | |
| | | १.९ संषोधन प्रष्न | |
| | | १.१० संषोधन परिकल्पना | |
| | | १.११ कार्यात्मक व्याख्या | |
| | | १.१२ संषोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा | |
| ०२ | २ | संबंधित व संषोधन साहित्याचा अढावा | |
| | | २.१ संषोधन विषयाषी संबंधीत साहित्य | |
| | | २.२ पूर्वी झालेल्या संषोधनाची उद्दिदीष्टये | |
| | | २.३ पूर्वी झालेली संषोधने | |
| | | २.४ प्रस्तूत संषोधनाचे वेगळ | |
| ०३ | ३ | संषोधन कार्यपध्दती | |
| | | ३.१ संषोधन | |
| | | ३.२ शैक्षणिक संषोधन | |
| | | ३.३ शैक्षणिक संषोधनाच्या पध्दती | |
| | | ३.४ जनसंख्या | |
| | | ३.५ नमुना निवड | |
| | | ३.६ संषोधन साधने | |
| ०४ | ४ | माहितीचे संकलन व अर्थनिर्वचन | |
| ०५ | ५ | निष्कर्ष व षिफारषी | |
| | | ५.१ निष्कर्ष | |
| | | ५.२ षिफारषी | |
| | | संदर्भ ग्रंथ | |
| | | परिषिष्टये | |
| | | वेळापत्रक | |
| | | संषोधन अहवाल प्रकरण योजना | |
| | | संदर्भ ग्रंथ सूची | |

# प्रकरण – पहिले – प्रस्तावना

## 1.1 विषयाची पार्श्वभूमी

शिक्षण ही नैसर्गिक व स्वयंस्फुर्त प्रक्रिया आहे. जन्माला येणारा प्रत्येक प्राणी जीवन संघर्ष करीत असतांना येणा–या अनुभवातुन आपल्या वर्तनात बदल करीत असतो ही वर्तनबदलाची म्हणजे शिक्षणाची प्रक्रिया कधी जाणीवपूर्वक घडते तर कधी अजाणतेपणाने घडते शिक्षण म्हणजे ज्ञान मेंदूत कोंबण्याची किंवा बाहेरून काही लादण्याची प्रक्रिया नाही तर स्वंयस्फुर्तीने अनुभव ग्रहण करून त्यानुसार वर्तनात बदल करण्याची प्रक्रिया आहे.

शिक्षण ही आमरण अखंड चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाचा व्यापक अर्थ म्हणजे अनुभवाव्दारे होणारे वर्तन परिवर्तन होय. अनुभव व्यक्तीला घरोदारी सर्वत्र येत असतात. अनुभव येणे जन्मापासून सुरू होते आणि मरेपर्यंत चालू राहते. म्हणूनच शिक्षण ही आमरण चालणारी प्रक्रिया आहे.तसेच शिक्षण ही केवळ ज्ञानात्मक पातळीवर चालणारी प्रक्रिया नसून ती भावात्मक तसेच क्रियात्मक पातळीवरही घडणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाचा संबंध ज्ञानप्राप्तीशी जोडल्यामुळे शिक्षणात केवळ ज्ञानात्मक बौध्दीक विकासाचाच विचार केला गेला. परंतु व्यक्तीमत्व विकासास ज्ञानात्मक अंगाप्रमाणे भावत्मक आणि क्रियात्मक अंगाचाही विकास होणे किती आवश्यक आहे, याची शिक्षण प्रक्रियेने दखल घेतलेली आहे. शिक्षण प्रक्रिया ही अनुभवातून घडते. आजच्या शिक्षणात अनुभव स्वानुभव याला अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. जॉन डयुईने म्हटल्याप्रमाणे व्यक्ती जितके जास्तीत जास्त अनुभव संपादन करेल तितके त्याचे भावी जीवन यशस्वी सफल होईल. अनुभव देणा–यांपेक्षा अनुभव घेणाराच जास्त महत्वाचा आहे. कारण जोपर्यंत तो अनुभव ग्रहण करणार नाही तोपर्यंत ही प्रक्रिया घडणार नाही.

विदया विहीनः पशुभि समानः।  
**किंवा**  
साहित्य संगित कला विहीनः।  
साक्षात पशुःपुच्छा विषाण हीनः

वरील श्लोकावरून मानवी जीवनात शिक्षणाचे महत्व किती अनन्य साधारण आहे हे स्पष्ट होते. मनुष्याने शिक्षणाच्या माध्यमातून ही जी उत्तुंग भरारी मारली आहे जे स्थान पटकावले आहे ते सातत्याने टिकवायचे असेल तर नवीन पिढीला जुन्या पिढीचा अनुभवाचा ठेवा आत्मसात करावाच लागेल. आजपर्यंत न उलगडलेल्या रहस्यांचा शोध घ्यावाच लागेल. त्यासाठी शिक्षणाला जीवनतून वगळता येणार नाही तर शिक्षणाला जीवनता केंद्रिय स्थानर दयावेच लागेल. शिक्षण ही नैसर्गिक स्वयंस्फुर्त प्रक्रिया असली तरी मानवाला समाजात यशस्वीपणे समायोजन कराता यावे म्हणून काही गोष्टी प्रयत्नपूर्वक शिकाव्या लागतील, केवळ निसर्ग प्राप्त शिक्षणावर अवलंबून राहता कामा नये. मानवाचे इतर मानवांशी ज्या भाषेतून व्यवहार चालतात ती भाषा समाजात वावरण्यासाठी लागणारेसामाजिक नीतिनियम रूढी, प्रथा, परंपरांची माहिती दैनंदिन गरजांची पूर्तता करणा–या उदरनिर्वाहाचे प्रशिक्षण इत्यादी गोष्टी जाणीवपूर्वक आत्मसात करणे आज अत्यावश्यक आहे.

"ज्ञान देव तु कैवल्यम" मानवाच्या जन्म मरणादी दुःख रूप संसार बंधनाचे मुख्य कारण आत्मस्वरूपाचे अज्ञान कारण आत्मस्वरूपाचे अज्ञान हे अज्ञान बंधनात आत्मज्ञानानेच दूर होवू शकते. – स्वामी पुरूषोत्तमानंद सरस्वती


शिक्षण ही व्यक्ती व समाजाला मार्गदर्शन करणारी एक शक्ती आहे. मानवाचे जीवन सुसंस्कारीत करणारी व समाजिक विकास घडवून आणणारी एक प्रक्रिया आहे. शिक्षणाच अर्थ पहावयाचा असेल तर सर्वप्रथम मानवी जीवनाचा क्रमविकास कसा झाला हे पहावे लागेल. मानवाचे प्रारंभिक जीवन विषयक मूलभूत गरजा भागविणे एवढाच प्रारंभिक अवस्थेत मानवाचा उद्देश होता. परंतु सृष्टीचक्रातील बदलाचा नैसर्गिक सृष्टीक्रमाचा, सृष्टीचक्राचा परिणाम मानवी मनावर झाला व हयातूनच मानवाचा निसर्गाशी असणारा मानवी संबंध शोधण्याचा प्रयत्न केला व संस्कृतीच्या निर्मितीच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. मानवाची रानटी अवस्था संपून एका नव्या अवस्थेला प्रारंभ झाला व माणूस आपल्या जीवनाचा खरा अर्थ शोधु लागला. या शोधातुन धर्म, कला तत्वज्ञान उदयास आले मूल्यसंकल्पना उदयाला आल्या व मानवी जीवनला उदात्त अधिष्ठान प्राप्त झाले. एका तात्विक, वैचारिक संघर्षाला प्रारंभ झाला. प्राचीन काळापासून हा वैचारिक संघर्ष आजतागायत सुरू आहे. मानवाची संस्कृती परंपरामूल्य नैतिकता हया सर्वांचे संस्कार प्रत्येक पिढीवर करण्याची आवश्यकता मानवाला भासू लागली व हयातून शिक्षण संकल्पनेचा उदय झाला, शिक्षणाचा आशय, उद्दिष्टये पध्दती, कालमानारूप बदलली समग्र मानवी जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडत गेल, पण या सर्वांचे श्रेय शिक्षणाकडे जाते. व्यक्ती व समाज यांना मार्गदर्शन करणारी शिक्षण ही एक शक्ती आहे. मानवाचे जीवन विकसीत करणारी व समान जीवन नियंत्रित करणारी शिक्षण ही एक प्रणाली आहे.

भारतीय तत्वज्ञानाच्या दृष्टीकोनातून शिक्षणाचा विचार केल्यास प्राचीन काळी शिक्षण प्रक्रिया ही ज्ञानप्राप्ती या संकल्पनेशी निगडीत होती. ज्ञानप्राप्ती हे पवित्र कर्म समजण्यात येत असे, "न हि ज्ञानेन सदृष पवित्रय इह विदयते" हे ज्ञान स्वरूप ज्ञानाशी निगडीत होते. "सा विदयाया विमुक्तये शिक्षण" "ऋृतू ज्ञानात न मुक्ती" मानवाला मुक्तीचा मार्ग दाखविते ते खरे शिक्षण. अध्यात्मिक ज्ञान प्राप्ती म्हणजे शिक्षण. ही संकल्पना प्राचीन काळी रूढ होती. ज्ञान म्हणजे मुक्ती, महाभरतात विदयेचे वर्णन आढळते ज्ञानचक्षु माणसाला जीवनाचे साफल्य शिकवितो व सार्थक जीवन जगण्याकरिता मदत करतो विवेकानंद म्हणतात, "जे शिक्षण जीवन संघर्षात माणसाला टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य प्राप्त करते तेच खरे शिक्षण." स्वामी विवेकानंदांनी प्राचीन आध्यात्मिक तत्वज्ञानाला व्यवहारिकतेची जोड दिली.

शिक्षणाकडे पाहण्याचा भारतीय दृष्टीकोन हा अधिकतम आध्यात्मिक आहे. परिस्थितीनुसार शिक्षण हे व्यवहारवादी, निसर्गवादी बनले, पण त्याचा मुलाधान अध्यात्माचा आहे. कारण आध्यात्मिकता हे भारताचे अंतरंग आहे.

# 1.2 संशोधन विषयाचे शीर्षक

नविन अभ्यासक्रमाच्या दृष्टीकोनातून मानव संसाधन विकसात प.पू.स्वामी चिन्मयानंद यांचे योगदान.



# 1.4 संशोधन विषयाची गरज

आधुनिकीकरणाच्या लाटेत आज अनेक प्राचीन विचारांची पुर्नस्थापना करण्याची वेळ आज आली आहे. आपल्या भारतीय संस्कृतीतील मूल्य समुहाचा युगानुकूल आशयाचा आपणास शोध घ्यावा लागेल, कारण आजची संस्कृतीही प्रचंड भोगवादी बनली आहे. स्वामी चिन्मयानंदाच्या विचारात धर्म, संस्कृती, हिंदूत्व, इ. विषयावरील युगानुकूल भाष्य आपणास आढळते. आज अनेक लोकांनी उच्च पदव्या संपादन केल्यात पण भारतीय आध्यात्मिक ऐश्वर्याबद्दल ते अदयापही अनभिज्ञच आहेत. ही अनभिज्ञता लक्षात घेवून वेदांताचे ज्ञान सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य प.पू. गुरूदेवांनी केले आहे. हयात गुरूदेवांनी स्थापन केलेल्या चिन्मय मिशनचा वाटाही खुप मोठा आहे. स्वामी चिन्मयानंद हे हिंदूत्वाचे भाष्यकार, युगशिक्षक, लोक शिक्षक होते ते आचार्य होते, संशोधक होते. तरूणांबाबतचा त्यांचा दृष्टीकोन अत्यंत सकारात्मक होता. राष्ट्रविकासासाठी सांस्कृतिक चळवळ महत्वाची आहे हा त्यांचा दृष्टीकोन होता आधुनिक युगात युवकांना पध्दतशीर प्रशिक्षण देवुन त्यांना माणूस घडविण्याचा प्रयत्नर त्यांनी केला. प.पू. गुरूदेव हे शिक्षणतज्ञ होते. पण त्यांचे शिक्षण विषयक विचाराशी व दृष्टीशी अदयापही शिक्षण क्षेत्र अनभिज्ञ आहे. भारतीय जनतेची ही अनभिज्ञता स्वामी चिन्मयानंदानी पाहिली आणि मग मात्र त्यांनी आपल्या सर्व कार्याचा संसाराचा सर्वतम परित्याग करून सन्यास दिक्षा घेवून ज्ञान संपादन केले व हे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले त्याचेच फळ म्हणजे आज चिन्मय मिश नही संस्था जगभर आपले ज्ञानप्रसाराचे कार्य करित आहे. प.पू. स्वामी चिन्मयानंदानी लावलेल्या चिन्मय मिशन हया रोपाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. समाजातील कोणतेही क्षेत्र असून जो ज्ञानाचे, शिक्षणाचे, आरोग्याचे, सेवेचे प्रत्येक क्षेत्रात चिन्मय मिशनचे काम वाखणण्या जागे आहे. केवळ वेद उपनीषदाचे, हिंदूतत्वज्ञानाचे भाष्यकार म्हणून आपल्याला त्यांच्याकडे पाहता येणार नाही, तो त्यांच्या कार्याचा गाभा आहे, पण त्या पेक्षाही ते युगशिक्षक, लोकशिक्षक होते व त्यांची ही भूमीका महत्वाची ठरते. ते एक शिक्षक होते, संशोधक होते, ते ख—या अर्थाने आचार्य होते. ते गुरू होते कोणत्याही भूमिकेतून आपणत्यांच्याकडे पाहिले तर त्यांचा लोकमानसावर पडलेला ठसा आपल्या लक्षात येतो. प्राचीन वेदप्रणित सिध्दित आजही कसे विज्ञानयुगात हे उपयुक्त आहे हे सांगण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती त्यामुळेच केवळ तरूण वर्गच नाही तर सर्वच स्तरातील लोकांचा ओढा त्यांच्याकडे असे. त्यांचा विशेष ओढा होता तो तरूणांकडे आणि म्हणूनच त्यांच्याकडे जे तरूण अभ्यासक असत, त्यांच्या सांस्कृतीक प्रगतीवर ते लक्ष ठेवून असत, त्यांचा मार्ग हा रचनात्मक सदाचाराचा आहे. चिन्मय मिशनचे सभासद ह काही हिमालयात राहणा—या तपस्वीसारखे शांत व निवृत्त जीवन जगत नाहीत, सध्याच्या संघर्ष युगातील ते आघाडीचे वीर आहेत. भारताच्या राजकीय व सामाजिक दैनंदिन कामकाजात हिरीरीने भग घेणारे हेच तरूण उदयाचे नेते आहेत. त्यांना राष्ट्राची जबाबदारी उचलायची आहे. त्यांचा तरूणांबाबतचा हा सकारात्मक दृष्टीकोन तर लक्षात येतोच पण त्यात राष्ट्र विकासाची तळमळ जाणवते, आमच्या सर्व समस्यांवर सांस्कृतीक जागरण हाच उपाय आहे हे त्यांनी जाणले होते. म्हणूनच या संशोधनाचे प्रयोजन आहे.

# 1.5 संशोधन विषयाचे महत्व

आज आपण 21 व्या शतकात आलो व अनेक क्षेत्रामध्ये आपण आघाडी मिळविली. अगदी कोणत्याही क्षेत्रात म्हणजे आर्थिक असो, सामाजिक असो, प्रत्येक क्षेत्रात आज भारताने उज्वल अशी प्रगती केली आहे. नव्हे 2020 च्या महासत्ता असणा–या भारताचे आपण स्वप्न पाहत आहोत ही सर्व प्रगती मन थक्क करून सोडणारी आहे. हया सर्व प्रगतीच्या लाटेत कोठेतरी आपल्या संस्कृतीला धोका निर्माण झाला आहे की काय इतपत भय निर्माण व्हावे अशी परिस्थिती समाजात निर्माण झाली आहे दृ हयाचे महत्वाचे कारण म्हणजे भारतीयांची मानसिक गुलामगीरी अनेक आक्रमणांना तोंड देतांना अनेक आक्रमणे आम्ही परतवून लावली, पण ज्यांनी आमच्यावर राज्य केले त्यांच्या संस्कृतीचे बीजारोपण हया हिंदूस्थानात झाले व आमची जीवन हर्ष आम्ही विसरलो. आधूनिककीरणाच्या नावाखाली अनेक पाश्चात्य संस्कारांचा अंगीकार करून समाजाचे पाश्चात्यिकरण झाले भारतीय आध्यात्म, भारतीय तत्वज्ञान, ज्ञान, संस्कृती हयाबाबत पुनश्च नव्याने विचार करण्याची वेळ आता भारतावर आली आहे अनेक विचार प्रवाहांच्या हया लाटेत हिंदुत्व, भारतीय जीवनदुष्टी हयाची पुनस्थापना करण्याची वेळ पुनश्च एकदा आली आहे. भारतीय संस्कृतीतील शाश्वत मूल्ये आज जशीच्या तशी लागु होतील असे नाही, पण त्या मुदयांना, त्या घटकांना आपल्याला टाकाउ समजता येणार नाही तर संस्कृतीतील मूल्य समुहाचा आपल्याला युगानुकूल आशय शोधावा लागेल. From the past to the present for the future हा आशय लक्षात घेवून आता आपल्याला शैक्षणिक वाटचाल करावी लागेल. भारतीय प्राचीन तत्वज्ञान हे ज्ञानाचे समृध्द आहे अनेक ज्ञानशाखांचा उगम हा भारतीय प्राचीन तत्वज्ञानात आपणास बघावयास मिळतो. अर्थात आधुनिक म्हटल्या जाणा–या ज्ञान शाखांचा सुध्दा उगम प्राचीन भारतीय तत्वज्ञानात आपणास बघावयास मिळतो. अर्थात आधुनिक म्हटल्या जाणा–या ज्ञान शाखांचा सुध्दा उगम प्राचीन भारतीय तत्वज्ञानात बघावयास मिळतो परंतु त्याचं भान अदयापही भारतीयामध्ये पुर्णत्वाने आले आहे असे वाटत नाही जुन्या अभ्यास क्रमाचा विचार केला असता असे लक्षात येते की, सर्वत्र मनमतांचा गलबला आपणास आढळतो जातीव्यवस्था, जातीभेद, धर्मभेद, धर्मविव्देश, प्रांतभेद, आर्थिक भेद हया सर्व प्रकारच्या भेदाभेदाने भारतीय समाज अगदी पोखरून निघाला आहे. वरवर समान वाटणारा भारत आज आतून उधळीच्या ताटयात गेला आहे. हा अधर्म आहे, भारताने पाश्चात्यांचा भौतिकवाद स्विकारला आणि तेव्हाच खरी भारताची अधोगती सुरू झाली. भारतीय समाज स्वतःची चेतना विसरला आणि त्यावेळी समाज राष्ट्रीय भावनाही लंगडी झाली. भारताचे खरे स्वरूप त्याच्या अंतरंगातीली अध्यात्मात आहे. पाश्चात्य संस्कृती ही भोगवादावर, अधिकार वादावर आधारित आहे तर भारतीय संस्कृती अध्यात्म व कर्तव्यावर आधारीत आहे. जेव्हा पाश्चात्यांचा भौतिकवाद स्विकारला तेव्हाच भोगवादाला सुध्दा आम्ही स्विकारले, भौतिक वादाने मानवाची प्रगती निश्चित केली यात वादच नाही, पण प्रगतीचा डोलारा भोगवदाच्या जयावर उभा करण्यात आला. त्याचे अध्यात्मिक अधिष्ठान कोठेतरी लुप्त झाल्याचा भास आज निर्माण होण्या इतपत गंभीर परिस्थिती भारतात निर्माण झाली आहे.

कुठल्याही देशातील स्त्री, पुरूष आणि मुले म्हणजे त्या देशाचे मनुष्यबळ होय, प्रत्येक देशात नैसर्गिक साधनसंपत्ती कमी–अधिक प्रमाणात असते. ळया साधन संपत्तीचा पुरेपुर वापर करण्याच्या दृष्टीकोनातून मनुष्यबळ विकास ही महत्वपूर्ण संकल्पना आहे. नैसर्गिक साधन संपत्तीच्या उपलब्धतेनुसार मनुष्यबळाचे नियोजन करणे आवश्यक असते.

हॉर्बिसन आणि चार्लस् यांनी आपल्या Education Man power and Economics Growth या ग्रंथात मनुष्यबळ विकासाची संकल्पना खालील प्रमाणे मांडली आहे.

"समाजातील सर्व नागरिकांनच्या ज्ञानात, कौशल्यात आणि क्षमतांमध्ये वाढ करण्याची प्रक्रिया म्हणजे मनुष्यबळ विकास होय"

"मानवी भांडवलाचा संचय आणि त्याची अर्थ व्यवस्थेच विकासात प्रभावी गुंतवणूक म्हणजे मनुष्यबळ विकास होय."

मनुष्यबळ विकासम्हणजे लोकशाहीतील नागरिकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी हाण्यासाठी तयार करणे होय.

वरील सर्व बाबींचा विचार करता देशातील नागरिंकांमध्ये असलेल्या क्षमता कौशल्य यांत वाढ करून नागरिकांना अधिका–अधिक विकसित करून त्यांचा विकासासाठी पुरेपुर उपयोग करून घेणे हे मानव संसाधन विकासात आवश्यक आहे.

अशा या मानव विकासाचा उपयोग करून त्यांना माणूस म्हणून घडविणे, त्यांना शिक्षण विषयक विचार देणे हा दृष्टीकोन पूर्णत्वास यावा म्हणून हया संशोधनाचे प्रयोजन आहे.

# 1.6 उद्दिष्टये

1. स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारतुन मानवीय समाज विचारांच्या संकल्पनांचा शोध घेणे.

2. N.C.F. 2005 च्या दस्ताऐवजातुन मानव कार्य संकल्पनांचा शोध घेणे.

3. स्वामी चिन्मयानंद यांच्या विचारं संकल्पनांचा नविन अभ्यासक्रमावरील प्रभाव पडताळणे

4. मानव संसाधन विकासस अनुसरून एक व्यापक अराखडा तयार करणे.

# 1.7 संशोधन चले

स्वाश्रयी चले :– प.पू. स्वामी चिन्मयानंद याचे शैक्षणिक विचार.

आश्रयी चले :– N.C.F. 2005 नुसार नविन अभ्यासक्रम.

बाहय चले :– सामाजिक, राजकिय, शैक्षणिक परिस्थिती.

# 1.8 संशोधनाची गृहीतके

1. स्वामी चिन्मयानंद यांच्या साहित्यातून विविध शैक्षणिक तत्वे अभिव्यक्त होतात.

2. स्वामी चिन्मयानंद यांनी व्यक्तीमत्व विकासाची एक व्यापक संकल्पना व योजना मांडली आहे.

3. आधुनिक शिक्षण पध्दतीवर स्वामी चिन्मयानंद यांच्या विचारांचा ब–याच आधुनिक संकल्पनांच्या बाबतीत पगडा आढळतो.

4. आधुनिक काळात स्वामी चिन्मयानंद व यांच्या विचारांचे महत्व पटवुन देता येते.

5. मानव संसाधन विकास घडवुन आणण्यासाठी स्वामीजींच्या साहित्याची नितांत आवश्यकता आहे.

6. जागतीककरणाच्या या युगात स्वामीजींचे योगदान महत्वाचे आहे.

## 1.9 संशोधन प्रश्न

प्र 1 ला) स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानात मानव संसाधन विकसास अनुसरून संकल्पनांचे विवेचन आहे काय ?

प्र. 2 रा) नविन अभ्यासक्रमांतर्गत मानवी संसाधन विकासास अनुसरून संकल्पनांचे विवेचन आहे काय ?

प्र. 3 रा) स्वामी चिन्मयानंद यांच्या मानव संसाधन विकास या संकल्पनेचा प्रभाव नविन अभ्यासक्रमावर आहे काय?

प्र. 4 था) आधूनिक काळात स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचे महत्व आहे काय?

## 1.10 संशोधन परिकल्पना

स्वामी चिन्मयानंद यांचे शैक्षणिक विचार व राष्ट्रीय अभ्याासक्रम आराखडा 2005 मधील शैक्षणिक विचार यात सहसंबध नाही.

# 1.11 कार्यात्मक व्याख्या

## 1. नविन अभ्यासक्रम –

एन.सी.ई.आर.टी. ने राष्ट्रीय शिक्षणाचा आराखडा एन.सी.एफ. 2005 हा तयार केला. त्यात नवनविन संकल्पनांचा व तत्वांचा अवलंब केला. हया आराखडयातील गाभाभूत घटकांचा अंतर्भाव विश्लेषणात्मक अभ्यासात करण्यात आलेला आहे.

## 2. स्वामी चिन्मयानांद –

स्वामी चिन्मयानंद यांनी वेदांत प्रसाराचे व त्याच्या माध्यमातुन शिक्षणाचे, मुल्य शिक्षणाचे कार्य केले असून त्यांनी चिन्मय मिशनची स्थापना केली व आज संपूर्ण जगभर चिन्मय मिशन ज्ञानाच्या क्षेत्रात शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहे.

## 3. मानव संसाधन विकास –

1. समाजातील सर्व नागरिकांच्या ज्ञानात, कौशल्यात आणि क्षमतांमध्ये वाढ करण्याची प्रक्रिया म्हणजे मनुष्यबळ विकास होय.
2. "मानवी भांडवलाचा संचय व त्याची अर्थव्यवस्थेच्या विकासात प्रभावी गुंतवणुक म्हणजे मनुष्यबळ विकास होय.

## 4. सहसंबंध –

1. दोन राशीमध्ये संबंध प्रस्थापीत करणे म्हणजे सहसंबंध होय.
2. एका चलामध्ये बदल झाल्यास दुस–या चलामध्ये कोणत्या प्रकारचा बदल होतो हे पाहणे म्हणजे सहसंबंध होय.

मनव संसाधन विकासत व नविन अभ्यासक्रम या दोन गोष्टीतील संबंध स्पष्ट करणे म्हणजेच त्यांच्यातील सहसंबंध सांगणे होय.

# 1.12 संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा

1. प्रस्तुत संशोधन चिन्मय मिशन पुरते मर्यादीत आहे.

2. प्रस्तुत संशोधन स्वामी चिन्मयानंद यांच्या ग्रंथ विचारापुरते मर्यादीत आहे.

3. प्रस्तुत संशोधन स्वामी चिन्मयानंद यांच्या ग्रंथ विचारापुरते मर्यादीत आहे.

4. प्रस्तुत संशोधन माध्यमिक स्तरावरील National curriculum frame work-2005 पुरते मर्यादीत आहे.

5. प्रस्तुत संशोधन हे चिन्मय ग्रंथलयापुरते मर्यादीत आहे.

6. प्रस्तुत संशोधन हे बी.एड., डी.टी.एड्. जेष्ठ शिक्षक व शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय अधिकारी यांच्या पुरते मर्यादीत राहील.

7. चिन्मय मिशनमधील आचार्य, सन्मानशील शिक्षणतज्ञ यांच्या पुरते मर्यादीत राहील.

# प्रकरण – दुसरे

## संबंधित व संशोधित साहित्याचा आढावा

"संशोधन विषयाच्या संबंधात जे महत्वपुर्ण ज्ञान उपलब्ध आहे त्याचा सारांश देणे व त्या विषयात उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा आधार घेवुन त्यापुढील ज्ञानाचा शोध घेण्यासाठी अथवा उपलब्ध ज्ञानाचा नविन परिस्थितीमधील दबलेला अर्थ विशद करणे यालाच संबंधित साहित्याचे परिशील असे म्हणतात."

महत्वपुर्ण ज्ञान संशोधन विषयाच्या संबंधातील विविध ग्रंथांमध्ये लेखन उपलब्ध असते.त्यातील योग्य त्या घटकाचे वाचन त्यावर मनन व उपयोजन म्हणजेच संबंधित साहित्याचा आढावा होय.

संशोधन पध्दतीमध्ये साहित्य म्हणजे ज्या क्षेत्रात संशोधन करावयाचे आहे त्या क्षेत्रातील ज्ञानामध्ये सैध्दांतिक, प्रात्यिकक्षिक, संशोधनांचा अभ्यास केला जातो. तर Review म्हणजे विशिष्ट क्षेत्रात संशोधन झाले आहे, त्यांचे संघटन करून आपण केलेले संशोधन हे त्यात नविन भर टाकणारे आहे याची माहिती म्हणजेच संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा होय.

## 2.1 संशोधन विषयाशी संबंधित साहित्य

संबंधित संशोधनाच्या आढाव्यातून संशोधकाला आपल्या संशोधनासाठी योग्य दिशा प्राप्त होते. आपल्या आवडीच क्षेत्रात कशा कशा स्वरूपाची संशोधने यापूर्वी झालेली आहेत याचा बोध होतो. तसेच प्रत्यक्ष कार्य अर्थात संशोधन करतांना प्रामुख्याने कोण–कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते याचा अंदाज बांधुन संशोधनाचे नियोजन व कार्यवाही करता येते. प्रस्तुत संशोधन हाती घेण्याअगोदर या क्षेत्रात कशा स्वरूपाचे संशोधन झालेले आहे याचा आढाव्यातूनच संशोधकाला आपल्या विषयाला अनुसरून नविन ज्ञान मिळविण्यात निश्चितच उपयोग होतो. याकरिता संबंधित संशोधनाचा आढावा येणे आवशक असते.

प्रस्तुत संशोधनातही पुढील संबंधित साहित्याचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच नंतरही संशोधनाच्या कालावधीत अभ्यासातून इतरही अनेक संबंधित साहित्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

1. Buch M.B. (1979) A survey of Research in Education Baroda Centre of Advance study in Education.

2. Buch M.B. (1979) IInd Survey of Research in Education Baroda Society for Education
Research Development

3. Buch M.B. (1986) IIIrd Survey of Research in Education New Delhi NCERT.

4. Buch M.B. (1991) IV the survey of Research in Education Volume No. 1 New Delhi NCERT

5. Buch M.B. (1991) V Survey of Research in Education Volume No. 2 New Delhi NCERT

6. Buch M.B. (1997) V Survey of Research in Education Volume No. 2 New Delhi NCERT.

## 2.2 पूर्वी झालेल्या संशोधनाची उद्दिष्टये

1. निवडलेल्या विषयासंबंधी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करून त्याची पुनरावृत्ती टाळणे व उचित संशोधन विषय निवडण्यास मार्गदर्शन मिळविणे.

2. निवडलेल्या विषयासंबंधी समुचित पध्दती तंत्र व चाचण्या बदल माहिती मिळविणे

3. संशोधन विषयासंबंधी सिद्धांत व गृहीतकृत्य यांच्या मांडणी बद्दल निश्चित कल्पना प्राप्त करून घेणे.

4. आधार सामग्री व निष्कर्ष या विषयी तुलनात्मक माहिती मिळविणे समर्पक सांख्यिकी तंत्र व त्याचा उपयोग आणि निर्वचन करण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.

5. संदर्भ साहित्याचा अभ्यास करून आपली ज्ञानवत्ता वाढविणे.

# 2.3 पूर्वी झालेली संशोधने

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने पूर्व संशोधनाच्या उद्दिष्टांचा योग्यविचार केलेला आहे. त्यानुसार पूर्व संशोधनाचा आपल्या संशोधनात आढावा घेतलेला आहे.

तसेच नंतरही संशोधनाच्या कालावधीत अभ्यासातून इतरही अनेक पूर्व संशोधनाचा आढावा घेण्यात येणार आहे.

## 1. अग्रवाल कुसूम 1992 – “Education Philosophy of Ramatirth” Ph.D. Education Agra University

### उद्दिष्टये :–

1. रामातीर्थ हयांच्या शैक्षणिक विचारांना व तात्विक विचारांना विश्लेषीत करणे.
2. शैक्षणिक विचारांचे भारतीय करणाच्या दृष्टीकोनातून व्यावहारिक सूचना देणे.

### निष्कर्ष :–

1. शिक्षण हे जीवन ध्येयावर आधरित असावे.
2. शिक्षणाचे ध्येय हे अंतर्गत क्षमतेला अभिव्यक्त करण्याची पात्रता वृध्दिंगत करणे हे असावे.
3. अभ्यासक्रमात भारतीय आदर्शाचा समावेश असावा.
4. वेदांताचे व्यावहारिक ज्ञान विदयार्थ्यांना देण्यात यावे.
5. शिक्षण प्रक्रियेत भौतिक, आध्यात्मिक, व्यक्तीगत घटकामध्ये समतोल असावा.
6. राष्ट्रप्रेम हे शिक्षणाचे ध्येय असावे.
7. शिक्षण हे आर्थिक दृष्टया स्वयंपूर्ण करणारे असावे.

**2.** Bhagwanti (1988) Education Philosophy of Dr. Radhakrishan and its relevance for social change.

**उदि्दष्टये :–**

1. विचारवंत म्हणून डॉ. राधाकृष्णन हयांचे स्थान पाहणे.

2. डॉ. राधाकृष्णन हयांचे सामाजिक स्थान तपासुन पाहणे.

3. डॉ. राधाकृष्णन यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाची चर्चा करणे.

4. डॉ. राधाकृष्णन हयांच्या विचारांचा सामाजिक Relevance पाहणे.

**निष्कर्ष :–**

1. तत्वज्ञानाचे हे जीवन जगण्याची कला व मार्ग आहे.

2. Spiritual Consciousness वर तत्वज्ञान आधारित आहे.

3. संस्कृती मूल्य व परंपरा हा शिक्षणाचा पाया असावा.

**3.** Bharate A. C. (1992) A Study of Philosophy of Acharya Vinoba Bhave and its Effect on Educational in Light of New Educational Policy (Ph.D.) Education Nagpur.

**उद्दिष्टये :–**

1. आचार्यांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.
2. NPE चा सखोल अभ्यास करणे.
3. NPE व आचार्यांच्या तत्वज्ञानाचा सहसंबंधाचा अभ्यास करणे.
4. नविन शिक्षण प्रणालीवरील आचार्यांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव पडताळणे.

**निष्कर्ष :–**

1. नविन अभ्यासक्रम हा नविन आव्हानांना समोर ठेवून तयार करण्यात आला आहे.
2. नविन अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेल्या बाबी आचार्यांच्या तत्वाानात आढळतात.
3. आचार्यांच्या ब–याच संकल्पना हया नविन अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

## 4. Chavada Jhaverilal Premjibhai 1991 % A Study of the Educational Thoughts of Mankad D. and its implementation, Ph.D. Education Saurashtra University.

**उद्दिष्टये :–**

1. D मंकड हयांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

2. जीवनातील शिक्षणाच्या अधिष्ठानाचा शोध घेणे.

3. अभ्यासक्रमाच्या पाय–या सुचविणे.

4. शिक्षकांच्या जबाबदा–या सांगणे.

5. सामाजिक उत्थानाकरिता शिक्षणाचे कार्य सांगणे.

6. D.M. च्या तत्वज्ञानाच्या दृष्टीकोनातून संस्थेच्या कार्याचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष :–**

D.M. हे ग्रामीण केंद्री शिक्षण व अभ्यासक्रमाच्या नैतिक अधिष्ठानाबाबत सकारात्मक विचार करणारे होते.

**5.** Das Gayadhar, 1990 Education philosophy of Shri. Aurobinda and its its Experiments in Orisa (Ph.D. Education Utkal University )

**उद्दिष्टये :–**

1. एकात्म शिक्षणाच्या विविध घटकांवर प्रकाश टाकणे.

2. To maintain the ideas of aconcerming to school plant school pattern curriculum methods of teaching the teacher environment discipline institutional management Eviduation.

**निष्कर्ष :–**

1. श्री. अरविंद हयांच्या एकात्मिक शिक्षणात पूर्ण मानवाचे मानसशास्त्र सामावलेले आहे.

2. एकात्म शिक्षणाचे 5 घटक आहे. 1. phisical with mental physics and spiritual.

3. Three Principles of internal Education.

1) Nothing can be thought
2) The mind has to be consulted on it growth
3) अध्यापनाची तीन साधने आहेत.
4) एकात्म शिक्षणात समाज, शिक्षक, पालक, संचालक, अध्ययनकर्ता आणि अभ्यासपूरक उपक्रम हयांचा समावेश होतो.

6. Dwivedi Kamla (1991) : A Comparative study of the educational Philosophy of Gandhiji in the world perspective (D.Lit.Edu. Kanpur)

**उद्दिष्टये :–**

1. महात्मा गांधीजींच्या जीवन तत्वाानाचे विश्लेषण करणे.

2. महात्मा गांधीजींच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे विश्लेषण करणे.

3. महात्मा गांधीजीच्या शैक्षणिक तत्वज्ञानाची इतर तत्वज्ञानाशी तुलना करणे.

4. महात्मा गांधीजींच्या विचारांची इतर तत्वज्ञांच्या विचारांशी, उपशाखांशी तुलना करणे.

**निष्कर्ष :–**

1. महात्मा गांधीजींचे विचार मुलांना अध्यात्मवादी आहेत पण त्यात कार्यवाद व प्रयोगवादाचे देखील प्रतिबिंब आढळते.

2. महात्मा गांधीजींनी शिक्षणाचा अर्थ विकसित केला आहे.

7. Prabhune, R. G. (1990) : A critical study of the literature of sane Guruji from the educational point of view.

**उद्दिष्टये :–**

1. साने गुरूजींच्या साहित्यातील शैक्षणिक उद्देशांचा शोध घेणे.

2. साने गुरूजींच्या साहित्यातून शैक्षणिक विचारांचा शोध घेणे.

3. शैक्षणिक मूल्यांचा शोध घेणे.

**निष्कर्ष :–**

1. प्रत्येक गोष्टीचा पाया प्रेम हा आहे. प्रेमाशिवाय शिक्षकाचे अध्यापन व्यवस्थित होत नाही. मूलभूत मूल्य, प्रेम, ज्ञान, शक्ती

2. मूलभूत मूल्य, प्रेम, ज्ञान, शक्ती.

3. प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा अधिकार असावा.

4. निसर्ग हा मोठा गुरू आहे.

5. शिक्षण हे उत्पन्न प्राप्त करण्याचे साधन असावे.

6. चारित्र्य निर्मितीचे साधन शिक्षण आहे.

**8.** Kesari, H. (1986) :- The geeta as learning process with Reference to modern Education (Ph.D. Education Osm University)

उद्दिदष्टये :–

1. वैयक्तिकतेच्या दृष्टीकोनातून पुढील संकल्पनांचा अभ्यास करणे. Self, absolute self, Material world, Education for material welfare, fearlessness, process of education.

2. जीवनाच्या अंतिम ध्येयाची परिभाषा करणे तसेच मानवी समस्यांच्या करणाचे विश्लेषण करणे.

3. काही संकल्पनांचे विश्लेषण करणे. Acquisition of wisdom purification of mind नैतिक मूल्यांचा विकास व्यक्तिमत्वाचा व राष्ट्रीय एकात्मतेचा विकास.

निष्कर्ष :–

1. भगवतगीता हे teaching learning चे एक पाठयपुस्तकच आहे.
2. भगवतगीता ही शिक्षणाला आशय प्राप्त करून देते.
3. Geeta's Metaphysicas आणि teaching learning process of education.

# 2.4 प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण

संबंधित साहित्य व पूर्व संशोधनाचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते की मानव संसाधन विकास व नविन अभ्यासक्रम यांचा एकत्रितपणे विचार याआधी झालेला नाही. हे विविध पूर्व संशोधनाच्या अभ्यासावरून निदर्शनास आले.

आजवर शिक्षणाबाबत अनेक परिभाषा करण्यात आल्या शिक्षणाचा अर्थ मानवाने अत्यंत संकुचित ठेवला पण जेव्हा जेव्हा मानवाने शिक्षणाबाबत संकुचित दृष्टीकोन ठेवला तेव्हा विविध तज्ञांनी शिक्षणाबाबत विविध संकल्पना मांडल्या. याप्रमाणेच स्वामी चिन्मयानंद हयांचे तत्वज्ञान आहे पण अदयाप ते शिक्षण क्षेत्राला दूर्लक्षित आहे. वेदांताचे आधुनिक काळातील एक गाढे अभ्यासक व महान ज्ञान तपस्वी स्वामी चिन्मयानंद हयांच्या कार्याला प्रकाशात आणणे ही आजच्या काळाची गरज आहे. वेदांताधिष्ठित तत्वज्ञानाचा शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणा–या चिन्मय मिशनचे जाळे संपूर्ण जगभर आहे व हया शाळांमध्येही आधुनिक शिक्षण व संस्कारशिक्षण हयांचा अत्यंत सुरेख समन्वय साधला आहे.

शिक्षण क्षेत्राला स्वामी चिन्मयानंद हयांची शैक्षणिक विचारधारा अदयाप अनभिज्ञ आहे. शिक्षणशास्त्राच्या अभ्यासक्रमात हयापूर्वी नमुद करण्यात आलेल्या सर्व तत्वज्ञ शिक्षण तज्ञांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. पण स्वामी चिन्मयानंद हयांच्या विचार प्रणालीचा अंतर्भाव मात्र अदयापही करण्यात आलेला नाही.

सदर विषयावर संशोधन या पूर्वी कुठल्याही अभ्यासकाने केलेला नाही असे संशोधिकेच्या नजरेत आले यातच विषयाचे वेगळेपण आहे.

# प्रकरण – तिसरे
# – संशोधन कार्यपध्दती –

## 3.1 संशोधन

आज ज्ञानाचे क्षेत्र झपाटयाने विस्तृत होत आहे. दिवसें दिवस नवनवीन संशोधन होत आहेत. मानवाच्या जीवनात सुख समाधान आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. सर्वच क्षेत्रात ज्ञानाचा विलक्षण विस्तार झालेला आज दिसतो आहे. वैज्ञानिक व इतर तज्ञानांच्या संशोधन कार्यातील अविरत, सातत्यपूर्ण, कसोशीने केलेले प्रयत्न त्याला कारणीभूत आहेत. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासुन शैक्षणिक क्षेत्रात प्रगती दृतगतीने झालेली दिसत असली तरीपण काही विषय शैक्षणिक अथवा सामाजिक अडसर अजुनही दूर आहेत. या समस्यांचे अभ्यासपूर्ण निराकरण करण्याचे व त्यांच्यावर उपाययोजना शोधण्याकरीता संशोधन हेच एकमेव उपयूक्त साधन आहे. या संदर्भात,

Research is the challenge that removes the threat of stagnation and decay from all society.

संशोधनाचा प्रमुख उद्‌देश नवे ज्ञान प्राप्त करणे, विदयमान तथ्याबदल नवा दृष्टीकोन प्रस्तुत करणे घटनांचे विश्लेषण करून त्यातील संबंध नव्याने प्रस्थापीत करणे एकंदरित ज्ञानाच्या कक्षा वाढवून मानवाच्या प्रगतीला पोषक परिस्थिती निर्माण करणे.

# 3.2 शैक्षणिक संशोधन

शिक्षण ही प्रक्रिया उद्दिष्टानुवर्ती असुन निरनिराळया प्रयोगांनी नवीन प्रभावी अध्यापन पध्दतीचा शोध घेणे आणि प्रस्थापित पध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणणे शक्य हाते. ज्ञानाचा इतर क्षेत्रांमधील विकास व त्या बद्दलच्या परिस्थितीचे पध्दतशीर ज्ञान प्राप्त करणे हे शिक्षण शास्त्राचे महत्वाचे कार्य होय, असे ज्ञान मिळविण्याच्या पध्दतीला शैक्षणिक संशोधन असे म्हणता येईल.


Educational Research aims to make contributions towards the solution of problems in the field of education by scientific philosophical method.

"शैक्षणिक संशोधन म्हणजे शिक्षण क्षेत्रातील उद्दिष्टये अभ्यासक्रम, अध्ययन अध्यापन पध्दती, मूल्यमापन, विदयार्थी, शिक्षण वातावरण, विविध संकल्पना, शैक्षणिक साहित्य, तंत्र, पाठयपुस्तक, इत्यादी पैकी एक व अनेक शैक्षणिक घटकांच्या संदर्भात निर्माण झालेल्या व होणा–या समस्यांचे शास्त्रशुध्द उत्तर शोधण्याचा केलेला अथवा करण्यात येणारा प्रयत्न" – जॉन बेस्ट

"Research is the typical process by which scientific knowledge is advanced in an ordinary manner by unitary quantum of sufficient size on the basis of previous knowledge and necessary assumptions reguarding the nature of the field."

# 3.3 शैक्षणिक संशोधनाच्या पध्दती

1. संशोधनाची उद्दिष्टये, माहिती संकलनाची तंत्रे, साधने इत्यादी प्रकारच्या आधारावर संशोधन पध्दतीचे वर्गीकरण करण्यात येते. संशोधन पध्दती पुढील प्रमाणे




प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

# 3.4 जनसंख्या

न्यादर्श अभ्यासात ज्यांच्या विषयी निष्कर्ष काढावयाचे असतात त्या सर्व व्यक्तींच्या किंवा वस्तुंच्या समुहाला जनसंख्या असे म्हणतात.

प्रस्तुत संशोधनाकरीता महाराष्ट्रातील 20 चिन्मय आश्रमांचा समावेश करण्यात येईल.

# 3.5 नमुना निवड

शैक्षणिक संशोधनात न्यादर्श मूलभूत आहे. शैक्षणिक समस्यांच्या अभ्यासात संपूर्ण जनसंख्या दृष्टीसमोर असली तरीपण तिचा अभ्यास करणे शक्य नसते. संपूर्ण जनसंख्येचे प्रतिनिधित्व करू शकणा–या एका लहान गटाच्या अभ्यासावरून संपूर्ण जनसंख्येच्या प्रवृत्तीबाबत पूर्वानूमान काढणे अधिक सोयीचे व श्रेयस्कर आहे. जनसंख्येच्या तथ्याविषयी पूर्वनूमान करण्याकरीता जनसंख्येतून निवडलेल्या व्यक्ती किंवा वस्तुंच्या लहान संचाला न्यादर्श म्हणतात.

“A sample the name implies is smaller representative of a large whole” –

George and Halt

नमुना पध्दती

संभाव्यता पध्दती

असंभाव्यता पध्दती

“In the social science,it is not possible to collect data from every respondent relevant to our study but only from some fractional part of the respondent the process of selecting the fractional part is called sampling.” - David S. Fox

# संशोधन नमुना निवड

## नमुना निवडीचे प्रकार

| संभाव्यतेवर आधारीत नमुना निवड | असंभाव्यतेवर आधारीत नमुना निवड |
|---|---|
| 1. सुगम यादृच्छिक न्यादर्श | 1. प्रासंगिक न्यादर्श |
| 2. नियमबध्द न्यादर्श | 2. निर्दिष्टांग न्यादर्श |
| 3. बहुस्तरीय न्यादर्श | 3. सप्रयोजन न्यादर्श |
| 4. वर्गीकृत न्यादर्श | |
| 5. गृच्छ न्यादर्श | |

प्रस्तुत संशोधनाकरीता बी.एड्. महाविदयालयातील अधिव्याख्याता, डी.टी. एड्. विदयालयातील अध्यापक, जेष्ठ शिक्षक, शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, चिन्मय साधक, महाराष्ट्रातील आचार्य, व ब्रम्हचारी हयांची निवड करण्यात येईल.

# 3.6 संशोधनाची साधने

संशोधनासाठी गुणात्मक व संख्यात्मक माहिती संकलित करण्यसाठी ज्या साधनाचा उपयोग केला जातो त्यास संशोधन साधने असे म्हणतात. संशोधनात विविध प्रकारची साधने वापरता येतात.

प्रस्तुत संशोधनासाठी प.पू. स्वामी चिन्मयानंद हयांच्या विचारांवर आधारीत पडताळा सूची (Check List), NCF 2005 वर आधारीत पडताळा सूची (Check List) , प.पू. गुरूदेवांचे उपलब्ध असणारे साहित्य, NCF 2005 चे दस्तऐवज चा वापर करण्यात येणार आहे.

# प्रकरण चौथे – 4

## माहितीचे संकलन व अर्थनिर्वचन

प्रस्तुत संशोधनात माहिती मिळविण्यासाठी मतावलींचा वापर करण्यात येणार आहे. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी टक्केवारी व सहसंबंध गुणांक (Pearson’s product moment coefficient of correlation) सांख्यिकी तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. जो (r) या संकेत चिन्हाने दर्शविला जातो.

# प्रकरण पाचवे – 5

# निष्कर्ष व शिफारशी

## 5.1 निष्कर्ष :

सांख्यिकीय तंत्राचा वापर केल्यानंतर आलेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात येतील.

## 5.2 शिफारशी :

प्रस्तुत संशोधनात आलेल्या निष्कर्षावरून शिफारशी देण्यात येईल.

# संदर्भ ग्रंथ

प्रस्तुत संशोधनाकरीता उपयोगात येणा—या ग्रंथ, नियतकालिके, संशोधन पत्रिका, मासिके, वर्तमानपत्रे iInternet इत्यादींची सोबत जोडण्यात येईल.

# परिशिष्टये

विदयार्थी यांच्याकडून माहिती संकलनाकरीता वापरण्यात आलेल्या मतावल्या, संपर्क पत्रे, सांख्यिकीय तक्ते, आलेख, उत्तर सूची तसेच संशोधनाच्या अनुषंगाने असणारी सर्व पत्रके परिशिष्टात जोडण्यात येतील.

# वेळापत्रक

प्रस्तुत संशोधनाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे :–

| अ. क्र. | कालावधी | अपेक्षित कृती |
|---|---|---|
| 1 | जुलै 2011 ते सप्टेंबर 2011 | प्रस्तावना व संबंधित सा. आढावा |
| 2 | 2 ऑक्टोबर 2011 ते फेब्रुवारी 2012 | संशोधन सा. तयार करणे |
| 3 | मार्च 2012 ते जुलै 2012 | माहिती संकलीत करणे |
| 4 | ऑगस्ट 2012 ते ऑक्टोबर 2012 | माहितीचे अर्थनिवर्चन |
| 5 | नोव्हेंबर 2012 ते डिसेंबर 2012 | माहितीच्या अर्थनिर्वचनावरून सुचना,शिफारशी, पुढील संशोधनाच्या दिशा |
| 6 | जनेवारी 2013 ते मार्च 2013 | प्रबंध अहवाल लेखन |
| 7 | एप्रिल 2013 | प्रबंध विदयापीठाकडे सादर करणे |

# पुस्तकांची नावे, लेखक, प्रकाशक


1. पंडित बन्सी बिहारी, लता मोरे (जून 2007),
   उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक,
   नागपूर पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स

2. दुनाखे अरविंद (2007),
   उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक
   पूणे, डायमंड पब्लिकेशन्स, पूणे–3

3. अहेर हिरा (मार्च 1997),
   उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक,
   नागपूर – विदया प्रकाशन

4. देव वसुधा विनोद (2007),
   शैक्षणिक चिंतन,
   नागपूर विसा बुक्स नागपूर

# <u>नियतकालीके</u>


| | |
|---|---|
| Swami Chinmayanand (2005) | Spiritual sign post - Tapovan Prasad |
| Ibid (July-2005) | On true Education - Chinmay Dindimah |
| Ibid (September 2006) | Change your thoughts - Chinmaya Sandesh |
| Ibid (June 1996) | Our Children Their Education – A National Challenge – Tapovan Prasad |
| Ibid (August 2003) | Education and Religion – Tapovan Prasad (P.6) |
| Ibid (September 2005) | Youth Fortification – Chinmaya Udghosh |
| Ibid (July 2006) | Guru Chinmaya Mission New Bulletin |
| Ibid(August 1998) | The Role of Teacher Tapovan Prasad |
| Ibid (July 1996) | A True Gurur and a Attend Discipline A vision comes true |
| Ibid (September 1997) | You are responsible for the Future of Country - Tapovan Prasad |
| Sundaram Viji (2001). | Chinmaya Mission – Transforming Lives., Mumbai : C.C.M.T. |
| Swami Chidananda (2001) | Call of the conch History of Chinmaya Mission. Mumbai : C.C.M.T. |
| Rukmani Ramani | Mission – Mumbai : C.C.M.T. |
| Swami Chinmayanand (2005) | Think Again, Mumbai : C.C.M.T. |

Ibid (2007) Gitas Words of Guidence. Mumbai : C.C.M.T.

Ibid (2006) Know what you have. Mumbai : C.C.M.T.

Ibid (2006) The Art of Living, Mumbai : C.C.M.T.

Ibid (1995) Source of Joy, Mumbai : C.C.M.T.

Ibid (2006) Forgive Me. Mumbai : C.C.M.T.

Ibid (2005) Jweleve Precious Pure, Mumbai : C.C.M.T.

Ibid (2005) Think Again, Mumbai : C.C.M.T.

Ibid (2006) Spiritual Culture, Mumbai : C.C.M.T.

Ibid (1998) Role of Mahatma in National Integration, Mumbai : C.C.M.T.

Ibid (1995). A Sweeping look at Vedanta. Mumbai : C.C.M.T.

Ibid (1996) Adhyatmic Sadhana, Mumbai : C.C.M.T.

Ibid (2001) More Speaks From the Fire. Mumbai : C.C.M.T.

Ibid (1997) Harmony and Beauty, Mumbai : C.C.M.T.

Ibid (2006) Vedanta in Action, Mumbai : C.C.M.T.

Ibid (2001) Chinmaya Vishwa, Mumbai : C.C.M.T.

Ibid (2005) Practice of Vedanta. Mumbai : C.C.M.T.

Ibid (2001) Mistry of Creation, Mumbai : C.C.M.T.

| | |
|---|---|
| Ibid (2004) | On The Path, Mumbai : C.C.M.T. |
| Ibid (2005) | Advice to Householders. Mumbai : C.C.M.T. |
| Ibid (2005) | The Question of Freedom, Mumbai : C.C.M.T. |
| Ibid (2006) | The Essential Teacher. Mumbai : C.C.M.T. |
| Ibid (2006) | The source of Inspiration Mumbai : C.C.M.T. |
| Ibid (1997) | Swami Chinmayanand As I Know, Mumbai : C.C.M.T. |
| Ibid (2006) | Tune in Mind, Mumbai : C.C.M.T. |
| Jois Rama M. (1998) | Human Right and Indian Values. New Delhi : NCERT |
| Lender Lilia (2006) | The Choice is yours. Mumbai : C.C.M.T. |
| Ibid (1997) | Planet in Crisis Actress to United Nations. Mumbai : C.C.M.T. |
| Ibid (2001) | Future of Country. Mumbai : C.C.M.T. |
| Swami Tejomayanand (2004) | Right Thinking. , Mumbai : C.C.M.T. |
| Naney Patchen (2006) | Journey of a master Swami Chinmayanand. Mumbai : C.C.M.T. |
| Swamini Samvidananda (1996) | Chinmay vision Program |

# हिंदी पुस्तके


गुप्त रामबाबू (1995) विश्वके महान शिक्षाशास्त्री. आग्रा : रतन प्रकाशन

स्वामी चिन्मयानंद (2006) शांती का स्वरूप : मुंबई : सी.सी.एम.टी

स्वामी चिन्मयानंद (1996) साधन पंचकम् : मुंबई : सी.सी.एम.टी

स्वामी चिन्मयानंद (1996) ऋषीयोका आवाहन : मुंबई : सी.सी.एम.टी

स्वामी चिन्मयानंद (2005) निष्काम कर्मयोग : मुंबई : सी.सी.एम.टी

स्वामी चिन्मयानंद (1997) सेवा करे. : मुंबई : सी.सी.एम.टी

स्वामी चिन्मयानंद (1980) विपूल लाभ का रहस्य. मुंबई : सी.सी.एम.टी

स्वामी चिन्मयानंद (2005) हमारे बच्चे हमारा भविष्य . मुंबई : सी.सी.एम.टी

स्वामी चिन्मयानंद (2005) आत्मविकास की कला. मुंबई : सी.सी.एम.टी

स्वामी चिन्मयानंद (2005) धर्म क्या है. मुंबई : सी.सी.एम.टी

– मार्गदर्शिका –

डॉ. वसुधा विनोद देव

एम. कॉम., एम.ए. (अर्थशास्त्र)

एम.ए.(विषय संप्रेषण)

एम.एड्., सेट (शिक्षणशास्त्र)

–संशोधिका–

सौ. स्मिता गजानन जोगळेकर

एम.एस.सी., एम.एड्